श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पं.स. पाथर्डी यांचे सेवानिलंबन कालावधीचे निर्णयाबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३४६/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ :- १. आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२७८/२०२४, दिनांक ११/१०/२०२४ (सेवा निलंबन आदेश)
२. आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र.१३५३७१२दिनांक २१/०६/२०२५ (पुन:स्थापित आदेश)
३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ/सी.आर. ४१/२०२५, दिनांक-१२/०९/२०२५.
४. ग.वि.अ.,पं.स.जामखेड यांचे पत्र क्र. वशि/आस्था-१/९८३/२०२५ दि.१७/१२/२०२५.
५.या कार्यालयाची सेवा निलंबन नोटीस क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३०३/२०२६,दि.१४/०७/२०२६.
६. श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) यांचा खुलासा दि.२०/०७/२०२६.

श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पं.स. पाथर्डी त्यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन व गैरव्यवहार केल्याने संदर्भ क्र.१ चे आदेशान्वये त्यांना आदेशाच्या दि.१५/१०/२०२४ पासुन सेवा निलंबित करणेत आलेले होते. संदर्भ क्र.२ चे आदेशान्वये, पंचायत समिती जामखेड येथे पुनःस्थापनेने पदस्थापना दिलेली होती. त्यानुसार श्री.इसरवाडे दिनांक २४/०६/२०२५ रोजी पंचायत समिती जामखेड येथे हजर झालेले आहेत.

श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पं.स. पाथर्डी, यांनी कामकाजात केलेल्या गैरवर्तनाबाबत संदर्भ क्र.३ च्या अहवालानुसार चौकशी अधिकारी यांच्यासमोर आलेली कागदपत्रे, साक्षीपुरावे व अपचारी यावरुन सर्व बाबींचा विचार करुन ०४ आरोप पैकी ०२ आरोप सिध्द झाले नाहीत व ०२ आरोप अंशत: सिध्द झाले आहे.

श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) यांचा दिनांक १५/१०/२०२४ ते दिनांक २३/०६/२०२५ या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधिन होती. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र. ५ चे नोटीसीमध्ये त्यांचा उक्त सेवा निलंबन कालावधी सर्व कारणांसाठी सेवा निलंबन कालावधी म्हणून का समजण्यात येऊ नये?, या बाबतचा खुलासा सदर नोटीस मिळालेपासून साठ दिवसांचे आत करणेबाबत फर्माविण्यात आले होते. उक्त नोटीस श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) यांनी संदर्भ क्र.६ अन्वये खुलासा सादर केला असुन सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कामांसाठी व्यतित केलेला कालावधी धरणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) यांचा खुलासा ~~मान्य~~/अमान्य करण्यात येवून, महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्त सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (५) (७) मधील तरतूदीनुसार निम्न स्वाक्षरीत नियुक्ती प्राधिकरणास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, श्री.मल्हारी पुंजाबा

इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) यांचा दिनांक १५/१०/२०२४ ते दिनांक २३/०६/२०२५ हा सेवा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व कारणांसाठी व्यतीत न केलेला कालावधी समजण्यात यावा, असे आदेश देत आहे. सदर आदेशाची नोंद श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२३०६०९२४ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 23-08-2026 16:00:35
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं),जामखेड
व्दारा व प्रत: -गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड.

२/- सोबतचा आदेश श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

३. कार्यासन-आस्थापना-ग्रामपंचायत -१,ग्रामपंचायत विभाग,जि.प.अहिल्यानगर.

४. निवड नस्ती.